# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** धंतोली झोन क्र. ४ येथिल नागरीक आरोग्य केंद्र, कॉटन मार्केटची
**{प्रकल्प विभाग}** इमारत जुनी असुन सदर जागेवर नविन नागरीक आरोग्य केंद्रची इमारत बांधण्याकरीता जुने व मोडकळीस आलेल्या इमारतीचे बांधकाम पाडण्याकरीता प्रस्ताव सादर केला असता मा. अधिक्षक अभियंता म.न.पा यांनी नस्तीमध्ये टाचण असलेले पान क्र. T-४ वर केलेल्या टिपन्नीच्या अनुषंगाने सदर इमारत पाडण्याकरीता सभागृहाची मान्यता घ्यावी लागेल असे नमुद आहे.

सदर जागेवर जुने व मोडकळीस आलेल्या इमारतीचे बांधकाम पाडण्याचा प्रस्ताव विचारात घेण्यास्तव माननीय आयुक्त महोदय यांची मान्यतेस्तव सादर प्रस्तुत.

टिप :-

१. जुनी इमारत पाडण्याचा खर्च नविन दवाखान्याची इमारत बांधण्याचा प्राकलणामध्ये अंर्तभुत करण्यात येईल.
२. सदर कामाकरीता मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.
३. सदर कामाकरीता मा. मुख्य अभियंता यांची दि.०२.१२.२०२४ ची मंजुरी प्राप्त आहे.
४. विस्तृत टिपन्नी संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 119/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 14/01/2025**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार धंतोली झोन क्र. ४ येथिल नागरीक आरोग्य केंद्र, कॉटन मार्केटची इमारत जुनी असुन सदर जागेवर नविन नागरीक आरोग्य केंद्रची इमारत बांधण्याकरीता जुने व मोडकळीस आलेल्या इमारतीचे बांधकाम पाडण्याकरीता प्रस्ताव सादर केला असता मा. अधिक्षक अभियंता म.न.पा यांनी नस्तीमध्ये टाचण असलेले पान क्र. T-४ वर केलेल्या टिपन्नीच्या अनुषंगाने सदर इमारत पाडण्याकरीता सभागृहाची मान्यता घ्यावी लागेल असे नमुद आहे.

सदर जागेवर जुने व मोडकळीस आलेल्या इमारतीचे बांधकाम पाडण्याचा प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.